मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वांसाठी आरोग्य संकल्पनेस उत्स्फूर्त प्रतिसाद >> पान 3

मेहकर नगरपरिषद निवडणुकीत चुरस शिगेला >> पान 4


**सुविचार**

''स्वप्न पहा, पण त्यासाठी झटतही रहा.''


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 108 ■ शनिवार, दि. 22 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





महेश भट्ट आणि दिव्या खोसला यांच्यात वाद झाल्यानंतर अभिनेत्रीनं ऑडिओ रेकॉर्डिंग केली लीक... आतील पान


# नवीन चार कामगार कायदे आजपासून देशात लागू

## डिजीटल माध्यमातील कामगारांचाही आहे समावेश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : प्रत्येक कामगाराला सन्मान मिळावा यासाठी, केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयानं महत्त्वाची घोषणा जाहीर केली. आजपासून देशात चार कामगार संहिता लागू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सध्याच्या २९ कामगार कायद्यात बदल करण्यात आलं आहेत.**



केंद्रीय कामगार मंत्रालयानं चार महत्त्वाच्या चार संहिता जाहीर केलेल्या आहेत. त्यामध्ये वेतन संहिता, २०१९, औद्योगिक संबंध संहिता, २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती संहिता, २०२० यांचा समावेश आहे. यातून कामगार नियमांचं आधुनिकीकरण करण्यायत येणार आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी कामगार सुधारणांना चालना देणाऱ्या हे धोरण करण्यात आलं आहे. त्यातून भविष्यासाठी मजबूत, लवचिक उद्योगांचा पाया रचला जाईल, असे रोजगार मंत्रालयानं म्हटलं आहे.

केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या माहितीनुसार देशातील अनेक कामगार कायदे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात (१९३०-१९५० च्या दशकात) तयार करण्यात आले होते. तेव्हा देशाची अर्थव्यवस्था आणि कामाचे स्वरुप पूर्णपणे भिन्न होते. त्यामुळे हे कायदे कालबाह्य ठरले आहेत. त्यामुळे कामगार आणि उद्योग यामध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे.

विकसित जगाशी जुळणारे मनुष्यबळ- चार कामगार संहितांची अंमलबजावणी करून आधुनिक जागतिक ट्रेंडशी जुळवून घेण्याची ही दीर्घकालीन गरज पूर्ण होईल. नवीन संहिता कामगार आणि उद्योग दोघांनाही सक्षम बनविले. त्यातून संरक्षित, उत्पादक आणि विकसित जगाशी जुळणारे मनुष्यबळ तयार होईल. त्यातून अधिक लवचिक, स्पर्धात्मक आणि स्वावलंबी राष्ट्राचा मार्ग मोकळा होईल.

विकसित भारताच्या ध्येयाला नवीन गती-केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी एक्स मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, प्रत्येक कामगारासाठी सन्मान ही सरकारची हमी आहे. आजपासून देशात नवीन कामगार संहिता लागू करण्यात आल्या आहेत. कामगारांसाठी वेळेवर किमान वेतनाची हमी, तरुणांना नियुक्ती पत्रांची हमी, महिलांना समान वेतन आणि आदराची हमी, ४० कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची हमी, एक वर्षाच्या नोकरीनंतर निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रॅच्युइटीची हमी, ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांसाठी मोफत वार्षिक आरोग्य तपासणीची हमी, जास्त काम केल्यास दुप्पट वेतनाची हमी देण्यात येणार आहे. अतिजोखमीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना १०० टक्के आरोग्य सुरक्षेची हमी, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी सुनिश्चित करण्यात येणार आहे. या सुधारणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगारांच्या कल्याणासाठी उचललेले एक मोठे पाऊल आहे. आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल असून २०४७ पर्यंत विकसित भारताच्या ध्येयाला नवीन गती देणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, सरकारने चार कामगार संहितांना लागू केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या सर्वात व्यापक आणि प्रगतीशील कामगार-केंद्रित सुधारणांपैकी ही सुधारणा आहे.

### काय आहेत सुधारणा

- ठराविक मुदतीसाठी घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखेच सर्व फायदे मिळतील. यात रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा यांचा समावेश आहे. पाच वर्षांऐवजी फक्त एका वर्षानंतर ते ग्रॅच्युइटीला पात्र ठरणार आहेत.
- गिग वर्क, प्लॅटफॉर्म वर्क आणि अ‍ॅग्रीगेटर्सची व्याख्या पहिल्यांदाच करण्यात आली आहे. अ‍ॅग्रीगेटर्सना वार्षिक उलाढालीच्या १-२ टक्के योगदान द्यावे लागेल. ते गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना देय/देय रकमेच्या ५ टक्के मर्यादित असेल. आधार-लिंक्ड युनिव्हर्सल अकाउंट नंबरमुळे कल्याणकारी लाभ सहजपणे उपलब्ध होतील.
- लिंगभेद कायदेशीररित्या प्रतिबंधित आहे. महिलांना पुरुषांप्रमाणेच समान वेतन मिळणार आहे.महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये आणि सर्व प्रकारच्या कामात (भूमिगत खाणकाम आणि जड यंत्रसामग्रीसह) काम करण्याची परवानगी आहे. मात्र, त्यासाठी त्यांची संमती आणि सुरक्षा उपाय अनिवार्य असणार आहे. तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अनिवार्य असणार आहे.
- सर्व कामगारांना किमान वेतनाची हमी आणि सर्व कामगारांना नियुक्ती पत्रे मिळतील.रजेदरम्यान वेतन देणे अनिवार्य करण्यात आले आहे. चांगले राहणीमान सुनिश्चित करण्यासाठी, कामगारांना केंद्र सरकारने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार वेतन मिळेल.
- सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अंतर्गत येणारे सर्व एमएसएमई कामगार कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार पात्र आहेत. सर्व कामगारांसाठी किमान वेतनाची हमी असेल. कामगारांना कॅन्टीन, पिण्याचे पाणी आणि विश्रांती क्षेत्रे यासारख्या सुविधा उपलब्ध असतील.
- इलेक्ट्रॉनिक मीडियामधील पत्रकार, डबिंग कलाकार आणि स्टंट व्यक्तींसह डिजिटल आणि ऑडिओ-व्हिज्युअल कामगारांना आता पूर्ण लाभ मिळतील. सर्व कामगारांसाठी अनिवार्य नियुक्ती पत्र असणार आहे. त्यामध्ये त्यांचे पदनाम, वेतन आणि सामाजिक सुरक्षा हक्क स्पष्टपणे नमूद असणार आहे.

## इमारत देखभाल व दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुमारे १९४ कोटी रुपयांच्या निधीचे वितरण

**मुंबई/प्रतिनिधी :** इमारत देखभाल दुरुस्ती आणि नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीची कामे सुरळीत व्हावीत यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नागपूर मंडळाकडे सुमारे १९४ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

या पैकी १५१ कोटी १९ लाख रुपयांचा निधी गेल्या वर्षीच देण्यात आला आहे. तो इमारत देखभाल दुरुस्तीसाठीचा आहे. तर नागपूरचे हिवाळी अधिवेशन सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने करावयाच्या पूर्वतयारीसाठी २० कोटी आणि इमारत देखभाल दुरुस्तीसाठी आणखी २२ कोटी ७६ लक्ष असा यावर्षी एकूण ४२ कोटी ७६ लक्ष रुपयांचा निधी नागपूर विभागास वितरित करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

## शुभमन गिल दुसऱ्या कसोटीतून बाहेर! 'या' खेळाडूकडे नेतृत्वाची जबाबदारी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत विरूद्ध दक्षिण आफ्रिका या दोन संघांमध्ये कसोटी सामन्यांची मालिका सुरु आहे. ईडन गार्डनवर झालेल्या पहिला कसोटी सामन्यात हरल्यानंतर भारतीय संघावर दबाव वाढला असून आता दुसरा कसोटी सामना निर्णायक ठरणार आहे. हा सामना गुवाहाटीत खेळला जाणार आहे. मात्र, या महत्वाच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे मालिकेतील दुसऱ्या सामन्यातून बाहेर पडला आहे.

पहिल्या कसोटीत फलंदाजी दरम्यान गिलच्या मानेला दुखापत झाली होती. त्यामुळे त्याला रिटायर्ड हर्ट व्हावे लागल्याने पुढील डावांत तो खेळू शकला नव्हता. परिणामी भारताला १० फलंदाजांसह खेळावे लागले. पण फलंदाजांच्या फ्लॉप शो मुळे भारतीय संघाचा डाव अवघ्या ९३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारतीय संघ विजयापासून ३० धावा दूर राहिला.

यानंतर दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघ गुवाहाटीत दाखल झाला आहे. गिललासुद्धा उपचारानंतर रविवारी डिस्चार्ज मिळाला असून तो संघासोबत गुवाहाटीत दाखल झाला होता. यामुळे गिल सामना खेळेल अशी आशा सर्वांना होती. मात्र त्याच्या तब्येतीमध्ये आवश्यक सुधारणा न झाल्याने दुसरा कसोटी सामना खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच पुढील उपचारासाठी तो मुंबईत येणार आहे. एका वृत्तानुसार ,आता संघाचे नेतृत्व ऋषभ पंत करणार असून, उपकर्णधार कोण असेल याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

## कोलकाता हादरलं! बांगलादेशात ढाकाजवळ ५.५ रिश्टर तिव्रतेचा भूकंप; ईशान्य भारतातही जाणवले धक्के

**मुंबई/प्रतिनिधी :** बांगलादेशची राजधानी ढाकाजवळ शुक्रवारी ५.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला, या भूकंपाचे धक्के थेट भारतातील कोलकाता आणि ईशान्य भारतातील अनेक भागांत जाणवले, या भूकंपाबद्दल युएस जिओलॉजिकल सर्व्हे (ळएउए)ने माहिती दिली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदु हा ढाका शहरापासून ५० किमी अंतरावर नरसिंगडी येथे होता.





## हिवाळी अधिवेशनाआधी केंद्र सरकारची सर्वपक्षीय बैठक

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी संसदेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजिजू हे संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहातील राजकीय पक्षांच्या सदस्यांची बैठक घेणार आहेत. मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्व पक्षांच्या नेत्यांना पत्राद्वारे बैठकीसाठी आमंत्रण दिले असून ही बैठक सोमवारी, ही सर्वपक्षीय बैठक, २४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता, नवी दिल्लीत संसद भवन अ‍ॅनेक्स या इमारतीच्या मुख्य समिती कक्षात होईल. संरक्षणमंत्री श्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार आहे.

संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सुरू होईल आणि सरकारी कामकाजाच्या अत्यावश्यक गरजांनुसार, अधिवेशन २० डिसेंबर २०२४ रोजी संपणार आहे. २६ डिसेंबर २०२४ रोजी असलेला संविधान दिन साजरा करण्याच्या निमित्ताने, लोकसभा आणि राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक होणार नाही

तसंच केंद्र सरकार या अधिवेशनात सादर करण्यात येणाऱ्या विधेयकांची माहितीही विरोधकांना देणार आहे. याशिवाय हिवाळी अधिवेशन सुरळीत पार पडण्यासाठी विरोधी पक्षांकडून सहकार्याचं आवाहनही केंद्र सरकार करणार आहे.या बैठकीत आगामी अधिवेशनात चर्चेसाठी येणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार असून दोन्ही सभागृहांचे कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडावे यासाठी सरकार एकमत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी संसदेत एक देश, एक निवडणूक यावरही चर्चा होण्याची शक्यता आहे.

हिवाळी अधिवेशनात कायदेविषयक कामे वेळेत पूर्ण व्हावीत, चर्चा अधिक परिणामकारक व्हावी आणि विरोधकांसोबत समन्वय साधून सत्र व्यवस्थित चालावे, यासाठी ही सर्वपक्षीय बैठक महत्त्वाची ठरणार आहे.

## बारामतीच्या नगर परिषदेत अजितदादांचे 'पॉवरफुल', निवडणुकी आधी मोठा विजय

**पुणे:** बारामती नगरपालिकेतील अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस असल्याने राजकीय हालचालींना वेग आला असून उमेदवारांमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळाली. बारामती नगरपरिषदेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्या राष्ट्रवादी आमने सामने असल्याने सगळ्यांचे लक्ष लागले होते. बारामतीत अजित पवार गटाला मोठे यश मिळाले असून बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीपूर्वीच अजित पवार गटाच्या नगरसेवक पदाच्या ८ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत.

बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. अजित पवारांनी बारामतीत एकला चलो रे अशी भूमिका घेतल्याने त्यांनी सर्वच ठिकाणी अमेदवार जाहीर केले होते. बारामती नगरपरिषद निवडणुकीकरिता नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाकरिता ३०० हून अधिक विक्रमी अर्ज दाखल झाले होते. पालिका निवडणुकीमध्ये अपक्षांकडून मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाले होते. त्यामुळे अपक्ष उमेदवारांची संख्या कमी करणे हे आव्हान होते. मात्र अजित पवार गटाला मोठे यश मिळाले असून निवडणुकीपूर्वीच आठ नगरसेवक निवडून आले आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा चौक येथील स्मृतिस्थळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी २१ नोव्हेंबर हा दिवस 'महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृति दिन' म्हणून पाळला जातो.

यावेळी स्मृतिस्थळावर विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई मनपाचे आयुक्त भूषण गगराणी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त देवेन भारती यांनीही पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी विविध पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## स्वातंत्र्यवीर सावरकर बदनामी प्रकरणी राहुल गांधींना मोठा दिलासा, निवडणुकीअगोदर खटला रद्द

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** राहुल गांधी यांच्याविरुद्ध सावरकर यांची बदनामी केल्याचा आरोप होता. याप्रकरणी नाशिक येथील दंडाधिकारी न्यायालयाने फौजदारी खटला सुरू करण्याचे आदेश दिले होते, परंतु राहुल गांधी यांच्या वतीने दाखल केलेल्या पुनर्निरीक्षण अर्जावर जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावणी केली. न्यायालयाने नमूद केले की, दंडाधिकारी न्यायालयाने खटला सुरू करतांना योग्य कायदेशीर प्रक्रियेचे पालन केले नाही आणि पुराव्यांचा तपास न करता निर्णय घेतला.

जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश बदर यांनी या खटल्यात दंडाधिकारी यांच्याकडून कायदेशीर प्रक्रियेचा विचार न करता खटला सुरू केल्याचे निरीक्षण नोंदवत, दंडाधिकारी न्यायालयाला पुन्हा प्रक्रिया तपासून पुढील कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच दंडाधिकारी न्यायालयाने



साक्षीदार आणि पुराव्यांची पडताळणी देखील केली नसल्याचे सांगत, खटला रद्द करण्यात आला. राहुल गांधी यांच्या वकील संघात ज्येष्ठ विधीज्ञ जयंत डी जायभावे, गजेंद सानप, अविनाश गाढे, सिध्दार्थ युवराज जाधव, आणि सानिका ठाकरे यांचा समावेश होता. या निर्णयामुळे सावरकर बदनामी आरोप प्रकरणात राहुल गांधी यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या निर्णयामुळे राहुल गांधींना न्यायालयात एक मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. सावरकर यांची बदनामी केल्याचे आरोप खंडित झाल्याने त्यांच्या विरोधात चालू असलेला खटला पुढे जाण्याची शक्यता कमी झाली आहे. या प्रकरणात न्यायालयाने ज्या प्रकारे दंडाधिकारी न्यायालयाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे, ते महत्वाचे मानले जात आहे.

काँग्रेस पक्षाने या निर्णयाचे स्वागत केले असून, राहुल गांधी यांना दिलासा मिळाल्याचा दावा केला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते म्हणाले, ''सावरकर यांचा संदर्भ घेऊन राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यानंतर बदनामीच्या आरोपांचा सामना करणाऱ्या राहुल गांधी यांना न्याय मिळाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.''

सदर प्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रिया कशी राबवली जाईल, याबाबत अधिक माहिती लवकरच मिळू शकते. याप्रकरणी न्यायालयाने दंडाधिकारी न्यायालयाला पुन्हा तपास करण्याचे आदेश दिले आहेत, त्यामुळे पुढील टप्प्यात काय होतं याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## समाजवादी विचारधारेचे पाईक मुलायमसिंग यादव

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर कॉंग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते कॉंग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा कॉंग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. तीन वर्षापूर्वी १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारधारेचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन !

# मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुंबई महानगर प्रदेशात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला गती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शहरी क्षेत्रातील स्वच्छता, पाणी-बचत आणि आरोग्य सुधारणा यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून मुंबईत राबवण्यात आलेला 'सुविधा केंद्र' उपक्रम आदर्श मॉडेल ठरत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान गती घेत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या अभियानात विविध संस्था जोडल्या जात आहेत.

हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त भागीदारीत सुरू झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीत मोठे परिणाम साधले आहेत. सध्या मुंबईत २३ केंद्रे कार्यरत असून, लवकरच २४ वे केंद्र सुरू होणार आहे. मुंबईत आणखी २ केंद्रे बांधकामाधीन असून ७ केंद्रांचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, एचएसबीसी आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या




सहकार्याने ही योजना पुढील काही वर्षांत अधिक विस्तारणार आहे.

शहरातील झोपडपट्टी आणि वंचित वस्त्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणाऱ्या स्वच्छता सुविधा देण्याचे उद्दिष्ट या केंद्रांमागे आहे. ५.५ लाख नागरिकांना आतापर्यंत याचा प्रत्यक्ष लाभ झाला असून, आरोग्यदृष्ट्यादेखील हे मॉडेल उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सुविधा केंद्रे ही स्वच्छतेच्या शाश्वत व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आणखी सुविधा केंद्रे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महानगरात 'सुविधा केंद्र' मॉडेलने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उत्तम कामाचे उदाहरण निर्माण केले आहे. ही केंद्रे शहराच्या आरोग्यसुरक्षेत मोठे योगदान देत आहेत. या सुविधा केंद्रामध्ये उत्तम सुविधा, लोकसहभाग, वर्तणूक बदल, आर्थिक आणि पर्यावरण टिकाव आणि कार्यक्षम संचालन यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे सर्व अत्यंत उल्लेखनीय असून हा उपक्रम शहरी महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये**

**सुरक्षित आणि सन्मानजनक स्वच्छता**

झोपडपट्टी व अनौपचारिक वसाहतींतील महिलांसाठी सुरक्षित शौचालय, मुलांसाठी स्वच्छ जागा, दिव्यांगांसाठी सुलभ रचना या सर्व बाबींमुळे सुविधा केंद्रे अत्यंत लोकाभिमुख झाली आहेत.

**पर्यावरणपूरक मॉडेल**

जल-बचत तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन यामुळे पर्यावरणीय शाश्वततेचा उत्तम नमुना तयार झाला आहे.

**समुदायातील महिलांचा सहभाग**

प्रशिक्षित ३०० महिलांनी राबवलेल्या वर्तनबदल मोहिमेमुळे ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण मिळाले. यामुळे नागरिकांच्या सवयी, वापर आणि आरोग्य-जाणीवेत सकारात्मक बदल घडला.

**आरोग्यदायी परिणाम**

'सुविधा केंद्रां'मुळे जठरांत्र, अतिसार आणि मूत्रमार्गाच्या संक्रमणात ५० टक्के घट झाली आहे. झोपडपट्टी क्षेत्रातील सर्वाधिक समस्या असलेल्या दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे आजार आता लक्षणीयरित्या कमी झाले आहेत.

**आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मॉडेल**

सुरुवातीपासून ९ महिन्यांत केंद्र स्वतःचा खर्च भागवू लागते ही या योजनेची मोठी ताकद आहे. आज मुंबईतील सर्व २३ केंद्रे पूर्णपणे स्वयं-टिकाऊ आहेत.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय मुंबई शहर/उपनगर मार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महामंडळाच्या विविध योजनांकरिता कर्ज प्रस्ताव महादिशा पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध बांधवांच्या स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना (पीएम-एजेएवाय) अंतर्गत ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करून जीवनमान उंचावणे हा या योजनांचा मुख्य उद्देश असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे. अर्जाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात होणार असून इच्छुक लाभार्थ्यांनी आपले अर्ज https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर करावेत. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष कार्यालयात कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**अर्ज करण्यास आवश्यक पात्रता**

अर्जदार अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी तीन लाख रुपये आहे. अर्जदार हा या महामंडळाच्या योजनांचा व इतर वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे**

जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखला. पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड ची प्रत.

कोटेशन व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागेचा पुरावा, व्यवसायानुसार इतर दाखले, आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, बँक खाते क्रमांक, पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.

अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ योजना, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या योजना, एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी शैक्षणिक कर्ज योजना या सर्व योजनांची सविस्तर माहिती, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी व पात्रतेच्या अटी महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर उपलब्ध आहेत. तरी सर्व इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यापूर्वी माहिती वाचून घेणे आवश्यक आहे. जास्तीत इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## महेश भट्ट आणि दिव्या खोसला यांच्यात वाद झाल्यानंतर अभिनेत्रीनं ऑडिओ रेकॉर्डिंग केली लीक...

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री दिव्या खोसलानं मुकेश भट्टबरोबरचा कॉल ऑडिओ रेकॉर्डिंग लीक केली आहे. बॉलिवूड अभिनेत्री दिव्या खोसलानं तिच्या विधानांनी अनेकदा सोशल मीडियावर खळबळ उडवून दिली आहे. अलीकडेच दिव्याचा मुकेश भट्टबरोबर वाद झाल्याची बातमी समोर आली होती. यानंतर दिव्यानं असा दावा केला होता की, आलिया भट्टचा जिगरा हा चित्रपट तिच्या सावी चित्रपटाप्रमाणे आहे आणि यानंतर तिचा मुकेश भट्टसोबत वाद निर्माण झाला. मुकेश यांनी आपल्या निवेदनात म्हटलं होतं की आलियाला कोणाचीही कॉपी करण्याची गरज नाही. यानंतर दिव्या खोसलानं एक गंभीर पाऊल उचलले. दिव्यानं मुकेशसोबतच्या तिच्या संभाषणाचा ऑडिओ लीक केला आहे, जो आता व्हायरल होत आहे.

# वडील अन् पती नसलेल्या लाडक्या बहिणींना ई-केवायसीसाठी शासनाची विशेष सुविधा

## ३१ डिसेंबरपर्यंत अंगणवाडी सेविकांकडे जमा करावी लागणार कागदपत्रे

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसीदरम्यान पती किंवा वडिलांचे आधार कार्ड देणे आवश्यक असल्याने अनेक महिलांची मोठी अडचण निर्माण झाली होती. मात्र, आता अशा महिलांसाठी शासनाने विशेष सुविधा सुरू करून दिली आहे. यामध्ये संबंधित लाभार्थी महिलांनी ई-केवायसी करून त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविकांकडे जमा करावी. त्यानंतर शहानिशा करून त्यांना लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे संबंधित लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाल्याचं चित्र आहे. मात्र ३१ डिसेंबरपर्यंत त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रांची पुर्तता लाभार्थी महिलांना करावी लागणार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व महिलांना आता ई केवायसी प्रक्रिया करणे बंधनकारक करण्यात आलं आहे. योजनेतील अपात्र महिलांना वगळण्यासाठी आणि गरजू महिलांनाच या राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. ई-केवायसीची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत आहे. ई-केवायसी न करणाऱ्या महिलांना पुढील हप्ता मिळण्यास अडचणी येऊ शकतात. ई-केवायसीसाठी पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक बंधनकारक केला असल्यामुळे अनेक महिलांसमोर अडचण निर्माण झाली होती.

ज्या लाभार्थी महिलांच्या वडीलांचा मृत्यू झालेला आहे आणि पती देखील हयात नाहीत किंवा त्या महिलेता पतीसोबत घटस्फोट झाला आहे, अशा महिलांना ई-केवायसी पूर्ण करताना आधार क्रमांक उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. अनेक विधवा, निराधार आणि एकल महिलांनी या नियमाविरोधात नाराजी व्यक्त केली असून, शासनाने पर्यायी उपाय द्यावा, अशी मागणी केली होती. त्यावर शासनाने अशा महिलांसाठी विशेष सुविधा तयार केली आहे. दरम्यान, महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेअंतर्गत वडील व पती दोघेही नसलेल्या, एकल, विधवा किंवा निराधार महिलांनाही हा लाभ कायम ठेवला आहे.

अंगणवाडी सेविकांकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी लागणार ही कागदपत्रे

- लाडकी बहीण योजनेंतर्गत ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील हयात नाहीत किंवा पती देखील हयात नाहीत किंवा घटस्फोट




झालेला आहे त्या लाभार्थी महिलांनी स्वतःची ई-केवायसी करून पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश याची प्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी.

- अंगणवाडी सेविकांनी त्यांच्याकडे लाभार्थी महिलांकडून दाखल केलेल्या प्रमाणपत्राची तपासणी करून त्या लाभार्थी महिलांना त्यांचे पती अथवा वडील यांची ई-केवायसी करण्यापासून सूट देण्यास पात्र असल्याची शिफारस बाल विकास प्रकल्प अधिकारी (उउझ्झज) यांचेमार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे दाखल करावी.

- त्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे महिला व बाल विकास आयुक्तांमार्फत शासनास शिफारस करणार आहेत. दरम्यान, वडील आणि पतीही हयात नाहीत, घटस्फोटीत लाभार्थ्यांनी अंगणवाडी सेविकांकडे कागदपत्रे जमा करावीत असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी आनंद खंडागळे यांच्याकडून करण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## नवीन फौजदारी कायद्यांवरील प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### २३ नोव्हेंबर पर्यंत प्रदर्शनाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन आझाद मैदान येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये २५ मिनिटे कालावधीच्या नाट्यातून प्रात्यक्षिकाद्वारे नवीन कायदे विस्तृतपणे समजावून सांगण्यात आले आहे. या वैविध्यपूर्ण प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हे प्रदर्शन रविवार २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजे दरम्यान खुले राहणार आहे.

प्रदर्शनामध्ये मुख्य नियंत्रण कक्ष, पोलीस ठाणे, न्याय सहाय्यक प्रयोगशाळा संचालनालय, न्याय वैद्यक व विष शास्त्र विभाग, अभियोग संचालनालय, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, उच्च न्यायालय आणि मध्यवर्ती कारागृह यांची दालने आहेत. या नवीन कायद्यातील कलमानुसार आरोपीला कशा पद्धतीने शिक्षा ठोठावण्यात येते, याचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण करण्यात आले आहे.

प्रदर्शनामध्ये विविध कलमांच्या माहितीचे पोस्टर्स आकर्षक रंगसंगतीने दाखविण्यात आले आहेत.

प्रदर्शनात केवळ सादरीकरणच नाही, तर कायद्याविषयी अधिक सखोल माहिती मिळण्यासाठी १० प्रश्नांच्या दोन मिनिटे कालावधी असलेल्या डिजिटल स्वरूपातील प्रश्नावलीच्या स्क्रीन्स ठेवण्यात आल्या आहेत. या स्क्रीनवर नागरिक प्रश्नांची उत्तरे देऊन या कायद्यासंबंधित अधिक माहिती जाणून घेत आहेत. तसेच प्रदर्शनाबाबत डिजिटल स्वरूपात प्रतिसाद देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. कारागृहांमध्ये कैद्याकडून निर्मित वस्तूंचे स्टॉल्सही या ठिकाणी आहेत.

प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन या नवीन फौजदारी कायद्याविषयी माहिती करून घ्यावी. विशेषत्वाने विद्यार्थी, विधिज्ञ, विधि शाखेचे विद्यार्थी, न्यायालयीन कर्मचारी यांनी भेट द्यावी, असे आवाहन गृह विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वांसाठी आरोग्य संकल्पनेस उत्स्फूर्त प्रतिसाद

- प्रोजेक्ट सुविता अंतर्गत राज्यात ५० लाखांहून अधिक पालकांची नोंदणी पूर्ण
- लसीकरणासाठी एसएमएस रिमाइंडर उपक्रमात महाराष्ट्र अग्रणी राज्य
- राज्यातील ९४ लाख लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले लसीकरण संदेश



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मातृ आणि बाल आरोग्य सेवांमध्ये डिजिटल माध्यमातून मोठी प्रगती साधली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून सुरू झालेल्याप्रोजेक्ट सुविता अंतर्गत ५० लाखांहून अधिक बालकांच्या पालकांची नोंदणी पूर्ण केली आहे. याशिवाय ४० लाख गर्भवती महिलांचा या उपक्रमात सहभाग नोंदविला गेला आहे. अशा प्रकारे राज्यात एकूण ९४ लाख लाभार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला असून, हा जगातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित व वर्तनशास्त्र-आधारित आरोग्य संप्रेषण कार्यक्रमांपैकी एक ठरला आहे.

जुलै २०२१ पासून राज्य शासनाने नॉन-प्रॉफिट संस्था 'डेव्हलपमेंट कॉन्सोर्टियम प्रोजेक्ट सुविता' यांच्या सहकार्याने एसएमएस रिमाइंडर कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत बालकांचे वेळेवर लसीकरण आणि गर्भवती महिलांसाठी मातृ आरोग्य सेवा वाढविण्यासाठी व्यक्तिनिष्ठ आणि वेळेवर पाठविले जाणारे एसएमएस संदेश दिले जातात. प्रत्येक संदेशात लसीचे नाव, त्या लसीने कोणत्या आजारांपासून संरक्षण होते याची माहिती आणि जवळच्या आरोग्य कर्मचाऱ्याशी संपर्क करण्याचे स्पष्ट आवाहन यांचा समावेश असतो.

हा उपक्रम वर्तनशास्त्र संशोधनावर आधारित असून, त्यात लाभार्थ्यांना आरोग्यविषयक निर्णय घेण्यासाठी सक्रिय प्रेरणा दिल्या जातात. जागतिक पातळीवरील संशोधनानुसार (अमेरिका, केनिया, नायजेरिया इ.) एसएमएस रिमाइंडरमुळे लसीकरण न झालेल्या मुलांची टक्केवारी सुमारे १५ टक्के नी घटते, असे आढळले आहे. सुविता प्रकल्पाच्या महाराष्ट्रातील सर्वेक्षणातही हेच निष्कर्ष दिसून आले आहेत. एसएमएस संदेशांमुळे पालकांचे आरोग्याविषयीचे ज्ञान वाढले असून ते वेळेवर लसीकरणासाठी आरोग्य केंद्रात येतात.

महाराष्ट्रातील सर्वेक्षणाचे निष्कर्ष

प्रोजेक्ट सुविता २०२५ मध्ये पालकांवर आणि २०२३ मध्ये आशा कर्मचाऱ्यांवर घेतलेल्या सर्वेक्षणांमध्ये पुढील निष्कर्ष समोर आले आहेत. १,१९२ पालकांपैकी ७० टक्के पालकांना सुविताकडून एसएमएस आल्याचे आठवते. त्यापैकी ४८ टक्के पालकांनी संदेशातील विषय (लसीकरण किंवा मातृ आरोग्य) योग्यरीत्या ओळखला. ४० टक्के लाभार्थ्यांनी संदेश अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले, तर ५.६ टक्के साठी तो प्राथमिक माहितीचा स्रोत ठरला.

९० आशा कर्मचाऱ्यांपैकी ६१ टक्के कर्मचाऱ्यांनी सांगितले की एसएमएस रिमाइंडरमुळे लसीकरणासाठी लाभार्थ्यांना एकत्र करणे अधिक सोपे झाले. त्यापैकी ३६ आशा ताईंनी नमूद केले की काही पालक फक्त एसएमएस मिळाल्यामुळेच आरोग्य केंद्रात आले.

लाभार्थ्यांचा आणि आशा कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद

उपक्रमाबाबत अनेक पालक आणि आशा कार्यकर्त्यांनी सकारात्मक अभिप्राय दिला आहे:

तुमचा हा प्रोग्राम खूप छान आहे. आम्ही पालकांना रिमाइंड करतोच, पण एसएमएस आल्यावर पालकांना वाटते की, शासनाकडूनही आपल्यावर लक्ष ठेवले जात आहे. त्यामुळे ते नक्की लसीकरणासाठी येतात.

-आशा आर. सरकळे, गाव: म्हसुरळे, तालुका खटाव, जि. सातारा

सुविता प्रोग्रॅममुळे पालक जागरूक झाले आहेत. आधी सांगूनही काहीजण येत नसत, पण एसएमएस आल्यावर ते स्वतः चौकशी करतात.

-आर. अत्तर, गाव: सुवाडी, तालुका फलटण, जि. सातारा

आम्ही शेतात असतो म्हणून आशा ताई घरापर्यंत येऊ शकत नाहीत. पण एसएमएसमुळे आम्हाला वेळेवर लसीकरणाची आठवण होते.

- शीला, गाव: जानेफळ, तालुका जाफराबाद, जि. जालना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिनंदन केले आहे. तसेच या कार्यक्रमाच्या यशामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या अधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. प्रोजेक्ट सुविता टीमचेही कौतुक करण्यात आले असून, शासनाने भविष्यातही या भागीदारीतून राज्यातील लसीकरण ९५ टक्के पेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

'प्रोजेक्ट सुविता' हा उपक्रम म्हणजे तंत्रज्ञान, वर्तनशास्त्र आणि आरोग्यसेवा यांचा संगम आहे. या कार्यक्रमामुळे पालकांचे ज्ञान, सहभाग आणि आरोग्य प्रणालीवरील विश्र्वास वाढला असून, महाराष्ट्राने पुन्हा एकदा डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात राष्ट्रीय नेतृत्व सिद्ध केले आहे.

## हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची उपकंपनी) मार्फत अर्जदारास व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना व एनएसएफडीसी योजना राबविण्यात येत आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनुसूचित जातीमधील हिंदू खाटीक या प्रवर्गामधील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

**अनुदान योजना–** या योजनेची प्रकल्प मर्यादा ५० हजार रुपये असून प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किवा जास्तीत जास्त २५ हजारपर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे तीन वर्षात करावयाची आहे.

**बीज भांडवल योजना –** या योजनेची प्रकल्प मर्यादा ५०,००१ ते ५ लाखापर्यंत असून प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत चार टक्के द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदान प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार पर्यंतचा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास पाच टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे.

**थेट कर्ज योजना–** या योजनेची प्रकल्प मर्यादा १ लाख रुपये पर्यंत असून प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित रक्कम ५० हजार रुपये महामंडळामार्फत चार टक्के द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे तीन वर्षात करावयाची आहे.

**एनएसएफडीसी योजना–** प्रकल्प मर्यादा १ लाख ४० हजार ते दोन लाखपर्यंत असून एकूण प्रकल्पाच्या ९० टक्के एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या मार्फत प्राप्त होते. मात्र जास्तीत जास्त ५० हजारच्या कमाल मर्यादित अनुदान आहे व उर्वरित रक्कम बीज भांडवल स्वरुपात देण्यात येते.या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी आवश्यक पात्रता अर्जदार अनुसूचित जातीतील हिंदू खाटिक संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. राज्य महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरिता तीन लाख रुपये इतकी आहे. अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा (राज्य / केंद्र) थकबाकीदार नसावा.

**अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे**

जातीचा व उत्पनाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला दाखला, पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड प्रत, पॅनकार्ड, कोटेशन, व्यवसायासाठी आवश्यक असल्यास जागेचा पुरावा, व्यवसायानुरुप इतर आवश्यक दाखले, आवश्यतेप्रमाणे प्रकल्प अहवाल. व्यवसायानुरुप आवश्यकतेप्रमाणे इतर दाखलेपत्र, उदा. वाहनाकरिता व व्यवसायाकरिता लायसन्स, परमिट, बॅज नंबर इत्यादी, बँकेचे खाते क्रमांक व पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## कोर्टाबाहेर तुफान राडा, नागरिकांचा कोर्टात घुसण्याचा प्रयत्न, पोलिसांचा लाठीचार्ज

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** मालेगावमध्ये चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या करण्यात आल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. आरोपीला आज कोर्टात हजर करण्यात आलं असताना नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला. संतप्त नागरिकांनी कोर्टात घुसण्याचा प्रयत्न केला आहे. कोर्टाबाहेर मोठ्या प्रमाणात जमलेल्या लोकांनी पोलिसांना ढकलत आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची लोकांची मागणी असून, मागील अनेक दिवसांपासून यासाठी मोर्चे काढले जात आहेत.

नेमकी घटना काय?

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे १७ नोव्हेंबरला धक्कादायक घटना घडली. तीन वर्षाच्या एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात मृतदेहाचं शवविच्छेदन करण्यात आलं. नातेवाईक आणि लोकांकडून नराधमावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलीस स्थानकात दाखल तक्रारीनुसार, तीन वर्षाची चिमुकली काही मुलांसोबत अंगणात खेळत असताना आरोपीने सर्वांना चॉकलेट दिलं. यावेळी त्याने पीडितचिमुकलीला चॉकलेट देण्याचे आमिष देऊन घरी नेले. मुलगी दिसत नसल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता ती आढळून आली नाही. त्यानंतर गावातच काही अंतरावर असलेल्या एका टॉवरच्या बाजूला चिमुकलीचा दगडाने ठेचलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. यानंतर पोलिसांना कळवण्यात आलं. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता अत्याचार करून खून केल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आले. पोलिसांनी तत्काळ सूत्रे फिरवत रात्रीतून फरार आरोपी विजय खैरनार याला अटक केली. मुलीच्या वडिलांशी झालेल्या वादातून विजयने हे कृत्य केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

अल्पवयीन मुलीच्या अत्याचार आणि खून प्रकरणात मालेगाव न्यायालय परिसरात तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. याआधीही न्यायालय आवारात महिलांनी आपला आक्रोश व्यक्त केला होता तर तरुणांनी ठिय्या आंदोलन केलं होते. न्यायालय आवराच्या दोघेही बाजूंना चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.


## शब्दकोडे क्र. 16

आडवे शब्द

१. पत्रातून गायब झालेला मायना ९. मत्सर ११. ढग १२. रुक्मिणीशी बलरामाचे नाते १३. उत्तराधिकारी १४. गायनातील एक ताल १६. मासला १८. नशीब लिहिणारी देवता २०. डाव असा खेळू नये २१. कठीण (प्रसंग) २२. नाजूकपणे, हळुवार २३. वैताग, त्रास २५. समुद्रदेवता २७. भीमाजवळचे शस्त्र २८. फुलपुडीत येणारी बिनवासाची फुले २९. लहान मुलांमधील अस्थमा ३१. उन्माद, गर्व ३२. एकशे पंचवीस ३३. त्रिकूट ३४. जीवमात्र ३५. चटकन ३७. धाक, दरारा ४०. गरज ४१. नारळाचे कवच ४३. दरोडा ४५. दिशाहीन पळणे ४९. राजवाडा ५०. बिरड्या ५१. चंद्र ५४. रुचीहीन ५५. वाळवी ५७. वाटाणा ५८. एक चर्मरोग ५९. मंत्रीमंडळ ६१. सीमेवरील चौकी ६२. विशेष ६३. डावा ६४. सुरुवातीलाच नकारघंटा! ६६. चातकासह सगळ्यांनाच वाट पाहायला लावणारा ऋतू ६७. सम्राट ६९. कशा प्रकारचा ७१. पौराणिक अश्वाहन ७२. भारताचे राष्ट्रीय फूल ७४. घरोघर ७५. खोडकर, खट्याळ (हिंदी) ७७. कबूतर ७८. दरवाजा ८०. महान, मोठा ८१. नम्रता ८२. संथ गतीने

उभे शब्द

१. खटल्याचा आधार २. अनेक विनोदी अभिनेत्यांना उजेडात आणणारा दूरदर्शनवरील कार्यक्रम ३. -- दमयंती ४. मदनाचे एक आयुध ५. आरास, मांडणी ६. बाईलबुद्ध्या ७. बाण, नदीचा काठ ८. अखेर, समाप्त ९. गुप्त हस्तक १०. दुर्गंधी येऊ लागलेला १३. खराब, हीन १५. लपणे, -- मारणे १७. खरे तर कर्णबधिर १८. अखेरीस १९. वेडावाकडा २२. नखरा, लकब २४. नखावरील ठिपका, घट्ट दही २५. नाट्यगीतातील 'बोल' २६. जुन्या काळी डोक्याला बांधले जाणारे वस्त्र २७. नामघोष २९. टणक खोडाचे काटेरी झाड ३०. खोड, सवय, चटक ३१. मर्कट ३२. युद्ध ३६. सिंह ३८. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ३९. चांदणी ४२. नमनीय ४४. दिवसभराचे एकूण कार्य ४५. सैल असलेले, ढगाळ ४६. भांडण, शत्रुत्व ४७. हिंदीत सुवर्ण किंवा झोपणे ४८. अफूचे बीज ५०. लाकूड छिलण्याचे हत्यार ५२. पाणी ५३. दमणे ५६. वर्तमानपत्रातील कप्पा ६०. पदार्थ शिजतानाचा आवाज ६१. ठाण्याच्या रहिवासी ६२. संसद सदस्य ६३. वाहणारी हवा ६५. लत्ता, पायाने मारणे ६६. वाटी, पात्र ६७. मादक स्त्री ६८. पराभव ६९. सुवर्ण, हाटक ७०. आंब्याची पोळी ७३. स्त्रियांची छेड काढणारा ७६. चांगला मावा ७७. गावगप्पांची जागा ७८. देणारा ७९. गद्दारी



### शब्दकोडे क्र. 15 चे उत्तर

आडवे उत्तर

१.हवालदार ६.आतेभाऊ ९.जड १०.रस ११.मामलतदार १५.रन १६.हरकत १८.वग १९.जबडा २१.मनोहर २२.वाकडातिकडा २४.रज २५.मसलत २७.दलाई लामा ३६.नेम ३८.वदन ४०.रामलीला ४२.हर ४४.देहदान ४६.करुण ४७.विनवणी ४९.हर्ष ५०.सहल ५२.आर ५३.वानर ५५.कस ५७.तरतरीत ५९.दारोदार ६०.रामरक्षा ६२.पाल ६३.सदन ६४.मास ६५.तलवार ६७.आज ६८.बारीकसारीक ७१.नट ७२.पर ७३.रंग ७५.पद ७७.चाकरमानी ८०.भरजरी ८१.रचना ८२.लटलट ८३.रज

उभे उत्तर

१.हरहर महादेव २.वासर ३.दामात ४.रम ५.औंदा ७.तेरडा ८.भान ९.जवाहरलाल नेहरू १२.लवकर १३.तगडा १४.रजक १७.कमलकिमान २०.बडा २१.मजला २३.तिन्हीसांज २४.रदबदली २६.तसा २९.नद ३१.डावरा ३३.रोमहर्षक ३५.मला ३७.रमण ३९.दशानन ४१.महाल ४३.पाणी ४४.देह ४५.नस ४६.करतल ४७.विवाहसमारंभ ४८.वरदान ५१.हजरत ५२.आरपार ५४.गोदावरी ५६.सरासरी ५८.तनुज ६१.क्षालन ६४.मासा ६६.वाटचाल ६७.आरमार ६८.बाजरी ६९.कपार ७०.कप ७२.पर ७४.गर ७६.दल ७८.कट ७९.नीज

# मेहकर नगरपरिषद निवडणुकीत चुरस शिगेला

## अध्यक्षपदासाठी ७, सदस्यपदासाठी तब्बल १३१ उमेदवार रिंगणात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच शहरातील राजकीय वातावरणात एक वेगळाच उत्साह आणि तणाव दोन्ही दिसू लागले आहेत. नगरपरिषद निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर विविध पक्षांनी आपल्या उमेदवारांची निवड, संभाव्य बंडखोरांची सांधेजोड आणि प्रचाराचा प्रारंभ या सर्व गोष्टींना वेग आला आहे. येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून या निवडणुकीत कोणत्या पक्षाची सत्ता स्थापन होणार याची उत्सुकता जनतेत आहे. अर्ज दाखल, छाननी आणि माघारी तीन टप्प्यांत रंगले राजकारण उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १० ते १७ नोव्हेंबर होती. या काळात मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज दाखल करून राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण केले.




त्यानंतर झालेल्या १८ नोव्हेंबरच्या छाननीत अध्यक्षपदासाठी १४ तर सदस्यपदासाठी तब्बल १७६ अर्ज वैध ठरले. छाननीनंतर अनेक ठिकाणी वादाची किंवा आक्षेपांची शक्यता व्यक्त होत असतानाच सर्व प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचे चित्र दिसून आले. २१ नोव्हेंबर हा अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस ठरला. या दिवशी मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी माघार घेतली.

अध्यक्षपदासाठी ७ उमेदवारांनी, लक्ष तर सदस्यपदासाठी ४५ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने अंतिम लढतीची समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलली. अंतिम रिंगण : सात अध्यक्ष, तब्बल १३१ नगरसेवक उमेदवार माघारीनंतर आता . अध्यक्षपदासाठी ७ उमेदवार रिंगणात उरले २६ नगरसेवक पदांसाठी १३१ उमेदवारांमध्ये तुफानी स्पर्धा मेहकर नगरपरिषदेच्या १३ प्रभागांमध्ये प्रत्येकी दोन नगरसेवक निवडले जाणार असून निवडणूक सरपणावर पोहोचताच प्रत्येक प्रभागात वेगवेगळ्या राजकीय गणितांची चर्चा सुरू आहे. काही प्रभागात बहुकोनी लढत, तर काही ठिकाणी थेट द्विपक्षीय संघर्षाची चिन्हे दिसून येत आहेत.

हिवाळ्याच्या दिवसात थंडीचा गारवा वाढत असला तरी मेहकरमधील राजकीय वातावरण मात्र भलतेच तापले आहे. विविध पक्षांचे नेते, माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती हे सर्वजण प्रचार मोहिमेत सक्रिय झाले आहेत.

या सर्वामुळे मेहकर शहर राजकीय दृष्टीने अक्षरशः जागे झाले आहे. उमेदवारांना प्रत्येक मत महत्त्वाचे असल्याने, दिवसभर भेटीगाठी आणि रात्री उशीरा पर्यंत रणनीती बैठका असा तुफान प्रचार पाहायला मिळत आहे. काही प्रभागांमध्ये सर्व पक्षांनी आपले "स्टार कॅम्पेनर" उतरवले असून वातावरण आणखी रंगत आहे.

**नगरपरिषद सत्तेसाठी प्रतिष्ठेची लढाई**

मेहकर नगरपरिषद शहरातील विकासकामांसाठी महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे सत्ता कोणाच्या हातात जाणार याकडे सर्वांचेच लक्ष आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शहर विकास आराखडा, बाजारपेठेचा विस्तार, पथदिवे यांसारख्या मुद्द्यांवर सर्वच उमेदवार जनता आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही निवडणूक अनेक राजकीय नेत्यांसाठी प्रतिष्ठेची लढाई ठरणार आहे.

### अध्यक्षपदासाठी सात उमेदवारांची माघार

अध्यक्षपदासाठी दाखल १४ अर्जांपैकी खालील उमेदवारांनी २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी मागे घेतली : कुरेशी मुनाफ मुसा रहेमत नगर कुरेशी शेख चांद अब्दुल राज्जाक अंभोरे राजेश लक्ष्मण.गवळी आमद कासम. अली शोएब अली महमूद.जाधव लक्ष्मण शेषराव कुरेशी शेख मनसब शेख अजीज माघारीमुळे आता ७ उमेदवारांमध्ये अध्यक्षपदासाठी थरार निर्माण झाला असून निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत आहे.

## आज लेकाचा साखरपुडा, रात्री ग्राऊंड फ्लोअरवर आग लागली; काचेच्या आलिशान बंगल्यात गुदमरून अवघ्या कुटुंबाचा अंत

**मुंबई/प्रतिनिधी :** गुजरातमधील गोध्रामध्ये मध्यरात्री आलिशान घराला लागलेल्या आगीत धुरामुळे गुदमरून एकाच कुटुंबातील चार जणांचा अंत झाला. आज याच घरात मोठ्या मुलाचे लग्न होणार होते. रात्रीच सर्व तयारी करण्यात आली होती. आज सकाळी ते वापीला जाणार होते, परंतु आगीतून निघणाऱ्या विषारी धुरामुळे त्यांचे प्राण गेले. मृतांमध्ये कमलभाई दोशी (५०), त्यांची पत्नी देवलाबेन (४५), त्यांचा मोठा मुलगा देव (२४) आणि त्यांचा धाकटा मुलगा राज (२२) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा तळमजल्यावरील एका सोफ्याला शॉर्ट सर्किट किंवा इतर कारणामुळे आग लागली. घर काचेने बंदिस्त होते. ज्यामुळे विषारी धूर बाहेर पडू शकला नाही. परिणामी, कोणालाही वाचण्याची संधीच मिळाली नाही.

सकाळी घरातून धूर निघताना शेजाऱ्यांनी अग्निशमन दलाला कळवले. तथापि, तोपर्यंत सर्वांचा मृत्यू झाला होता. गोध्रा येथील वर्धमान ज्वेलर्सशी संबंध असल्यामुळे हे देशी कुटुंब प्रसिद्ध होते. ज्या घरातून त्यांच्या साखरपुड्यासाठी निघणार होते त्याच घरातून या चारही सदस्यांच्या अंत्ययात्रा निघाल्या.

## औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक सनदीची आवश्यकता नाही

**-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची माहिती -शासन परिपत्रक जारी ; उद्योग घटकांना दिलासा**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करून अकृषिक परवानगीच्या सनदेच्या आवश्यकतेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे. यासाठी काही कालावधी लागणार असून ही कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराकरीता सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

याबाबत महसूल विभागाने शासन परिपत्रक जारी केला आहे. या शासन परिपत्रकानुसार ज्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा आहे त्यांनी सक्षम नियोजन प्रधिकरणाकडून विकास परवानगी घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर केल्यानंतर त्यांची एक प्रत संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यासाठी सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अधिकार अभिलेखात नोंद घेऊन अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही यथाशीघ्र पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागद्वारे सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांपैकी व्यवसाय सुलभता हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझनेस) या उपक्रमाचा उद्देश भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अनुकूल व्यवसाय परिसंस्था निर्माण करणे हा असून यासाठी विविध सुधारणात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. या सुधारणा व्यवसाय सुधारणा कृती आराखड्चा भाग म्हणून राबवल्या जातात. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहितातील कलमान्वये जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

परंतु, या तरतुदींनुसार जमीनधारकांना मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक असून त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही व वेळ हा जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता लागणाऱ्या परवानगी एवढाच लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करुन अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याचे शासनस्तरावर प्रस्तावित आहे. यास्तव, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करुन शासनस्तरावरील अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने, एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक सनदेची आवश्यकता नसल्याबाबत दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्य शासनाच्या महसूल विभागाने हे शासन परिपत्रक जारी केल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

### नाशिकमध्ये आफ्रिकन स्वाईन फिव्हरची नोंद, प्रशासन अलर्ट मोडवर!

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक शहरात आफ्रिकन स्वाईन फिव्हरचा प्रादुर्भाव आढळल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. शहरातील एका मृत वराहाचा नमुना भोपाळ येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी ॲनिमल डिसीज येथे पाठवण्यात आला होता. तपासणीत नमुन्यात आफ्रिकन स्वाईन फिव्हरचा संसर्ग असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी पाथर्डी येथील महापालिकेच्या खतप्रकल्पाजवळील एक किलोमीटर परिसर बाधित क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.तपासणीनंतर लगेचच जिल्हा पशुसंवर्धन विभाग आणि महापालिकेला रोग नियंत्रणासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अलीकडे वराहांच्या (डुक्करांच्या) मृत्यूचे प्रमाण अचानक वाढल्याने प्रशासनाने मृत प्राण्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवले होते. प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर बाधित आणि त्यालगतचा दहा किलोमीटर परिसर 'निरीक्षण क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आला आहे. तसेच रोग प्रतिबंधासाठी बाधित क्षेत्रातील एक किलोमीटरच्या परिसरातील सर्व वराहांना काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने लावून परिसराचे निर्जंतुकीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित भागात सक्रिय निरीक्षण आणि जैवसुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा; समान हक्क व सन्मानावर भर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** समाज कल्याण कार्यालयामार्फत आज बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे शासकीय वसतीगृहात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समान हक्क, संवेदनशील व सन्मानावर भर देण्यात आला.

दि. २० नोव्हेंबर २००५ रोजी तृतीयपंथीय समुदायाला भेडसावणाऱ्या अन्याय, भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात नोंद झालेल्या घटनांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. त्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा अधिकृत कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे बाल कल्याण समिती सदस्य अधिवक्ता अनुराधा वावगे यांनी तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध कायदे, दस्तऐवजांमध्ये होणारे बदल, शिक्षण, आरोग्य, आर्थिक मदत आणि इतर कल्याणकारी योजनांची माहिती तपशीलवार दिली. मॉडेल डिग्री कॉलेज प्राचार्य व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. डांगे यांनी १८ वर्षाखालील तृतीयपंथीय बालकांचाही "बाल" या श्रेणीत समावेश असल्याचे सांगून अशा बालकांसाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तृतीयपंथीयांच्या विकासासाठी जिल्हा प्रशासन कायम पाठिशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण निरीक्षक गीता केदार यांनी केले. त्यांनी तृतीयपंथीय हक्क अधिनियम २०१९ मधील प्रमुख कायदेशीर तरतुदी, हक्क संरक्षण, शासनाच्या जबाबदाऱ्या आणि तृतीयपंथीयांना मिळणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. समाजातील भेदभाव, अपमानास्पद वर्तन, तसेच तृतीयपंथीयांना येणाऱ्या दैनंदिन अडचणींचा विशेष उल्लेख करून समाजमान्यता आणि समान संधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमात तृतीयपंथीय प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले. तृतीयपंथीय तक्रार निवारण समितीचे सदस्य सनावर कुरेशी यांनी शासनाने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. अमरसिंग राठोड (आम्रपाली) यांनी समाजाकडून मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे अनुभव सांगत, आजचा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत असल्याने मिळालेल्या सन्मानाबद्दल समाधान व्यक्त केले. मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी रोशन गवई यांनी सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार आहेत, तृतीयपंथीयही त्याला अपवाद नाहीत, मानवता हाच खरा धर्म असल्याचे सांगत संवेदनशीलतेचे आवाहन केले.

कार्यक्रमामध्ये पोस्टर डिझाईनिंग स्पर्धा घेण्यांत आली. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पुजा शिंगने, व्दितीय क्रमांक स्नेहल तायडे व तृतीय क्रमांक शितल अनिल माने या यशस्वी उमेदवारांना बक्षिसे वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी पुजा शिगंणे यांनी केले.

### वृत्तविशेष...

## ठाणे-घाटकोपर ते थेट नवी मुंबई विमानतळ, गेमचेंजर प्लॅनची तयारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो मार्गिका अधिक प्रभावीपणे एकमेकांशी जोडण्यासाठी सिडकोने मोठे नियोजन सुरू केले आहे. विशेषत: मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही आंतरराष्ट्रीय विमानतळांदरम्यान अखंड मेट्रो सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी वतुर्ळाकार पद्धतीचा आराखडा तयार केला जात आहे. त्यासोबतच ठाणे ते नवी मुंबई विमानतळ असा वेगळा मेट्रो मार्ग (१-२२) उभारण्याबाबतही एमएमआरडीए प्राथमिक अभ्यास करत आहे, अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

पूर्व उपनगर तसेच ठाण्याकडील प्रवाशांना थेट विमानतळ मेट्रो वापरता यावी यासाठी घाटकोपर परिसरात मेट्रो ४ आणि मेट्रो ८ यांचे एकत्रिकरण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. गिरोडीया नगर परिसरात स्वतंत्र प्रवेश-निर्गमन मार्ग तयार करून हा संगम साधता येऊ शकतो.

कल्याण-भिवंडी मेट्रोचा विस्तार तळोजापर्यंत करण्याचा विचार असून तळोजाहून उलवे येथील 'सागर संगम'पर्यंत सिडकोची मेट्रो १ वाढवून ती थेट मेट्रो ८ शी जोडता येईल, असा आराखडा समोर आला आहे. यामुळे कल्याण, भिवंडी, तळोजा, खारघर अशा भागांतून नवी मुंबई विमानतळापर्यंत सहज पोहोच सुनिश्चित होईल.

ठाणे ते नवी मुंबई विमानतळ स्वतंत्र मार्गिकेचा पर्याय

ठाण्यावरून विमानतळाकडे जलद मेट्रो कनेक्टिव्हिटी मिळावी यासाठी भविष्यात 'ठाणे-नवी मुंबई विमानतळ' असा स्वतंत्र मार्ग विकसित करण्याचाही सिडकोचा विचार चालू आहे. सध्या ठाणे-घाटकोपर-विमानतळ असा मार्ग शक्य असला तरी स्वतंत्र मार्गिकेमुळे प्रवास अधिक वेगवान होईल.

या संपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर आराखडा सिडकोने राज्य सरकारकडे सादर केला असून मंत्रिमंडळाची मंजुरी लवकर मिळण्याची चिन्हे आहेत. वाढत्या प्रवासी भाराचा विचार करता आणि दोन्ही विमानतळांना प्रभावी मेट्रोने जोडण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

## पार्थ पवारांच्या जमीन घोटाळा प्रकरणात शितल तेजवानींची पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने केली पाच तास चौकशी!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या फर्मशी संबंधित पुणे जमीन व्यवहार प्रकरणात पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शीतल तेजवानी यांचा पुन्हा एकदा जबाब नोंदवला आहे. पोलिसांनी मंगळवारी तेजवानी यांचा प्रथम जबाब नोंदवला होता. तर दुसरी चौकशी काल (२० नोव्हेंबर) करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नियमांचे उल्लंघन करून पवारांच्या अमेडिया एंटरप्रायजेस एलएलपीला ज्या २७२ मूळ वतनदारांची जमीन विकण्यात आली होती, त्यासाठी तेजवानी यांनी पॉवर ऑफ ॲटर्नी घेतली होती. काल झालेल्या चौकशीमध्ये तेजवानी आयुक्त कार्यालयात चार तासांहून अधिक काळ उपस्थित होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, तेजवानी यांनी दिलेली माहिती, सादर केलेली कागदपत्रे किंवा संबंधित सरकारी विभाग आणि कार्यालयाकडून आम्हाला जे काही मिळाले आहे त्याची पडताळणी सुरू असल्यामुळे चौकशीबाबत नोंदवलेल्या जबाबातील कोणताच मजकूर उघड करणार नसल्याचे पुणे पोलीस आयुक्तांनी सांगितले आहे. मुंढवा जमीन व्यवहार प्रकरणात तेजवानी, पार्थ पवार यांचे भागीदार दिग्विजय पाटील, निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले आणि इतरांवर गैरव्यवहाराचा आरोप आहे. अमेडिया एंटरप्रायजेस एलएलपी आणि तेजवानी यांच्यातील ३०० कोटी रुपयांचा वादग्रस्त करार, ज्यामध्ये पार्थ पवार यांचा ९९ टक्के हिस्सा आहे. या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क देखील वादग्रस्तपणे माफ करण्यात आले. हा भूखंड सरकारने दशकांपूर्वी ताब्यात घेतला होता आणि २०३८ पर्यंत बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला भाडेतत्त्वावर दिला होता.

## मुंबई मनपाबाबत भाजपाचा अंतर्गत सर्व्हे, 100 जागा मिळण्याचा अंदाज; पण स्वबळासाठी कसरत करावी लागणार!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपनं अंतर्गत सर्व्हे केल्याची माहिती समोर आली आहे. याअंतर्गत सर्व्हेमध्ये भाजपाला १०० हून अधिक जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. सध्या महापालिकेत भाजपचे ८२ नगरसेवक आहेत. असं असताना भाजपचा विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बालेकिल्ल्यावरही डोळा आहे. विरोधकांच्या वॉर्डात भाजप नवी रणतीनी आखण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जातंय. उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेसच्या वॉर्डमध्ये भाजपनं चाचपणी सुरु केल्याची माहिती आहे. त्यामुळे आगामी महापालिकेत भाजपची रणनीती काय आणि त्यांना किती जागा मिळणार हे पाहाणं महत्त्वाचं असणार आहे.